# यावल महाविद्यालयात आत्मनिर्भर युवती कार्यशाळा

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यावल आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत' सायबर क्राईम आणि डिजिटल फसवणूक 'या विषयावर दुसरे पुष्प श्री. अविनाश दहिफळे सो, (यावल पोलीस स्टेशन) यांनी गुंफले .सायबर गुन्हा किंवा संगणकीय गुन्हा ही संज्ञा संगणक व इंटरनेट संबंधित असणाऱ्या व प्रत्यक्ष गुन्ह्यात संगणकाचा प्रामुख्याने वापर असणाऱ्या गुन्ह्याला उद्देशून जोडली आहे. असे त्यांनी विचार मांडले  सायबर गुन्हे विशेष करून हॅकिंग ऑनलाइन फसवणूक चित्रण प्रताधिकार भंग, या स्वरूपात घडताना दिसून येतात .यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य  डॉ. संध्या सोनवणे यांनी आपल्या मनोगतात तंत्रज्ञानाच्या युगात जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात फसवणुकीच्या घटना घडत आहेत .त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमीच सतर्क राहिले पाहिजे असे विचार मांडले. या कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.एस. पी. कापडे, प्रा. आर. डी. पवार, प्रा.डॉ. पी. व्ही. पावरा, प्रा. डॉ.अनिल पाटील, प्रा. संतोष जाधव, प्रा.गणेश जाधव, प्रा. सुभाष कामडी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रम प्रसंगी हजर होते. या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ . भंगाळे यांनी केले.


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठ,जळगांव
व
ज.जि.म.वि.प्र.सह समाजाचे
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
यावल जि.जळगांव
आत्मनिर्भर युवती अभियान
यावल.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठ, जळगांव
व
ज.जि.म.वि.प्र.सह समाजाचे
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
यावल जि. जळगांव
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
आत्मनिर्भर युवती अभियान
दि.२७ फेब्रु.२०२३
मार्च २०२३
GPS Map Camera
Yawal, Maharashtra, India
5P94+HWG, Bhaskar Nagar, Yawal, Maharashtra 425301, India
Lat 21.169195°
Long 75.707527°
02/03/23 10:50 AM GMT +05:30
Google

पुण्य नगरी

# यावल महाविद्यालयात डिजिटल बँकिंग विषयावर मार्गदर्शन

यावल : जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक



सहकारी समाज संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर युवतीअभियानांतर्गत' 'डिजिटल बँकिंग व्यवहार' या विषयावर यावल येथील आय. डी.बी.आय. बँक सहाय्यक मॅनेजर शेखर पाटील यांनी चौथे पुष्प गुंफले.प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार आदी उपस्थित होते.प्रास्ताविक डॉ. एस. पी. कापडे यांनी केले.

शेखर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, सध्याच्या वर्तमान युगात डिजिटल बँक व्यवहार काळाची गरज आहे .ई बँकिंग तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून प्रत्येकाने आचरणात आणावा. माहिती तंत्रज्ञानाची अत्याधुनिक साधने वापरावी. उदाहरणार्थ यूपीआय, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, बँकिंग कार्ड, मोबाईल वॉलेट इत्यादी हे डिजिटल बँक प्रकार विस्तृतपणे विशद केले. अध्यक्षा प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी मार्गदर्शनात डिजिटल बँकिंग आणि ऑनलाईन बँकिंग यातील फरक मांडला,तसेच डिजिटल बँकिंगचे फायदे मांडले. सूत्रसंचालन प्राची पाटील हिने केले तर आभार पूजा पाटील ने मानले.यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील डॉ. अनिल पाटील,डॉ. संतोष जाधव प्रा सुभाष कामडी, प्रा. मयूर सोनवणे, प्रा. भारती सोनवणे, डॉ. वैशाली कोष्टी, मिलिंद बोरगडे, संतोष ठाकूर तसेच विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

Smart Jalgaon Edition
Mar 4, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com